नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/१०/२०२६ (सोमवार )

---

## डायल ११२ सेवेत नागपूर ग्रामीण पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी सप्टेंबर २०२६ मध्ये राज्यात चौथा क्रमांक प्राप्त

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण ,श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधिक्षक गृह, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी डायल ११२ आपत्कालीन प्रतिसाद सेवेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सप्टेंबर महिन्यात डायल ११२ सेवेमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने राज्यात चौथा क्रमांक प्राप्त केला असून, आपत्कालीन कॉल प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी पोहोचण्याचा सरासरी प्रतिसाद वेळ ३.२३ मिनिटे इतका राहिला आहे.

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ, प्रभावी व गुणवत्तापूर्ण पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

# नवरात्रोत्सव—विजयादशमीच्या पार्श्वभुमीवर भिवापूर येथे तालुकास्तरीय शांतता समिती बैठक

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण ,श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी नवरात्रोत्सव—विजयादशमीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस स्टेशन भिवापूरच्या वतीने दिनांक ०५/१०/२०२६ रोजी जिचकार सभागृह, भिवापूर येथे शांतता समिती, महिला दक्षता समिती, पोलीस पाटील, पत्रकार व ज्येष्ठ नागरिकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस तहसीलदार श्री. संजय राठोड, मुख्याधिकारी, नगरपंचायत भिवापूर श्री. पार्थ गेडाम तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. रवींद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर उपस्थित होते. बैठकीदरम्यान नवरात्रोत्सव काळात देवी मंडपांची स्थापना, ध्वनी प्रदूषण, विसर्जन मिरवणुकीचा मार्ग, वाहतूक व्यवस्था, विजयादशमीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता सामाजिक सलोखा, शांतता व बंधुभाव कायम राखण्याचे आवाहन उपस्थित नागरिकांना करण्यात आले.

यावेळी नागरिकांनी विविध सूचना व मते मांडली. आगामी सण उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनास पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन नागरिकांनी दिले. बैठकीस भिवापूर शहरातील सुमारे १०० ते १२५ प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य, महिला दक्षता समिती सदस्या, पोलीस पाटील, पत्रकार व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. सण—उत्सवाच्या काळात नागरिकांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.


स्तरीय
शांतता समिति बैठक
दिनांक : 05/10/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता
स्थळ : जिचकार सभागृह, भीवापूर
सन्माननीय उपस्थित मान्यवर :
आयोजक - पोलिस स्टेशन भीवापूर, जि. नागपूर (ग्रामीण)
आपले हार्दिक स्वागत!


आयोजक - पोलिस स्टेशन भीवापूर, जि. नागपूर (ग्रामीण)

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक ०५/१०/२०२६ रोजी खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन उमरेड:—** **पोलीस स्टेशन उमरेड** येथे पोलीस निरीक्षक श्री. धनाजी जळक प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांनी पोलीस पाटील व शांतता समिती सदस्य यांची बैठक घेवुन सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन वेलतुर :—** पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांनी विश्वव्यापी हायस्कुल, वेलतुर येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन कुही :—** **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकरी ,पोलीस स्टेशन कुही यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीसांनी बस स्थानक तसेच क्रिडा संकुल येथे भेट देवुन सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच UPI, PhonePe, Google Pay यांसारख्या डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

**नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न**

हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.








## बेकायदेशीर दगडी कोळशाची वाहतूक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद
## २ आरोपी अटक
## ४१ लाख ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कन्हान:– दिनांक ०४/१०/२०२६ रोजी कन्हान पोलीस रात्री पेट्रोलींग करीत असतांना मौजा बोरडा गावाजवळ चैतन्य राईस मिलसमोर एक संशयित ट्रक जाताना आढळून आला. पोलिसांनी सदर ट्रक थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये दगडी कोळसा भरलेला असल्याचे निदर्शनास आले. ट्रकचालकाला नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **कमल शिवराम उजले, वय ४२ वर्षे, रा. घर क्र. ३१७, अहिरखेडी, कुंदन नगर, राजन नगर, मध्यप्रदेश** असे सांगितले. तसेच सदर दगडी कोळसा वाहतुकीबाबत आवश्यक कागदपत्रे मागितले असता त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नव्हती . मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे **संजय छोटेलाल कश्यप, वय २३ वर्षे, रा. गोंडेगाव कन्हान ता, पारशिवनी जि. नागपुर** अशी माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एकुण २९८९० किलो दगडी कोळसा किंमती १,४९,४५०/– रूपये व ट्रक क्र. एम पी ०९/एच जे ५७५० किंमती ४०,००,०००/– रूपये असा एकुण**

**४१,४९,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद गुन्हयात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०२ गुन्हे दाखल,

**दिनांक ०४/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०२ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे छोटु महादेव पाटील, वय ३९ वर्ष, रा. भरतवाडा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे बिरबल जंगल्या सोनबरसे, वय ६८ वर्ष, रा.अंबाडा (देशमुख), तह. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १६२० मिली देशी दारू, १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण १७२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक ०४/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी नामे **१) नरेन्द्र धनराज धवड, वय २५ वर्ष, रा. किलापुरा पाटणसावंगी, सावनेर ता. सावनेर, जि. नागपुर २) रोशन सेकराम कहले, वय ३५ वर्ष, रा. किलापुरा पाटणसावगी सावनेर, ता. सावनेर** यांच्यावर एक गुन्हा तसेच आरोपी क्र. **३) शेख मीरू शेख पीरू पठान, वय ६० वर्ष, रा. पाटणसावंगी सावनेर, ता. सावनेर, जि. नागपुर आणि ४) रामेश्वर चोखीलाल भलावी, वय ५० वर्ष, रा. पाटणसावगी सावनेर, ता. सावनेर, जि. नागपुर** यांच्या वर एक गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद आरोपी हे पोळा

मैदान पाटणसावगी सावनेर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**